ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 7 | ISSUE - 5 | JAN - 2021

HISTORICITY RESEARCH JOURNAL

हिंदू-मुस्लीम ऐक्याचे प्रतीक १८५७ चा उठाव

डॉ.संतोष शंकरराव इंगोले

इतिहास विभाग, श्री तुळशीरामजी जाधव आर्ट्स अँड सायन्स कॉलेज वाशिम.

ब्रिटिशांनी भारताच्या भूमिमध्ये जाती विरूध्द जात, धर्माविरूध्द धर्म, प्रांत विरोधी प्रांत, विचारांविरोधी विचार, असा भेद वाढविण्याला सुरूवात केली. त्यामुळे भारत एक राष्ट्र नाही, तर या भूमिमध्ये अनेक राष्ट्र आहेत, या विचारांचा प्रसार मोठया प्रमाणात झाला. भारतात अनेक राष्ट्राच्या अस्तित्वाच्या ब्रिटिशांच्या दाव्या विरोधी एकराष्ट्रीयत्वाच्या भावनेने सर्व धर्मीयांची मिळुन स्थापन झालेल्या 'भारतीय राष्ट्रीय काँग्रेस ला' ब्रिटिशांनी विरोध केला.

संबंधित घटना ब्रिटिशांनी अवलंबविलेल्या 'फोडा आणि झोडा' धोरणाचे स्वरूप आणि त्यामधून निर्माण झालेली राष्ट्रवादी चळवळ, आणि या चळवळी दडपून टाकण्याविषयी ब्रिटिशांनी स्विकारलेल्या धोरणात सांप्रदयिकवाद, जातीयवादी स्वरुप दिसून येते.

1857 चा उठाव :

इ.स. 1857 चा उठाव ब्रिटिशकालीन भारताच्या इतिहासातील महत्त्वाची घटना आहे. कारण या घटनेने ब्रिटिशांच्या भारतविषयक धोरणामध्ये मोठया प्रमाणात बदल घडून आला. त्यानूसार अवलंबविण्यात आलेले हे बदलाचे धोरण भारताच्या दिर्घकालीन भविष्यावर महत्त्वाचा परिणाम करणारे होते. म्हणुन या घटनेविषयी भारतीय व विदेशी विद्वानामध्ये एकमत आढळुन येत नाही. विनायक दामोधर सावरकर, अशोक मेहता याच्यासारख्या विद्वावांनी या घटनेला 'राष्ट्रीय उठाव' म्हटले. तर सर जॉन लॉरेन्स, सर जॉन सिले, ऑट्रम या विदेशी विद्वानांनी 'सैनिकांचे बंड' एव्हढयापूरतेच त्याचे महत्व विषद आहे, असे म्हटले, तर एस. एन. सेन यांच्यासारख्या अभ्यासकाने त्याला ''धार्मिक संघर्षाच्या रूपाने झालेल्या बंडाची सुरूवात, त्याचा शेवट स्वातंत्र्याच्या उठावात झाला.''[1] असे म्हटले.

या उठावामध्ये ब्रिटिशांच्या विरोधी लढणाऱ्या भारतातील दोन प्रमुख धार्मिक जमाती होत्या. त्या म्हणजे हिन्दु आणि मुसलमान या आहेत. या उठावाच्यावेळी हिंदू आणि मुसलमान जमातीमध्ये ऐक्य होते की, नाही. याविषयी सुध्दा विद्वानामध्ये एकमत दिसून येत नाही. आर. सी. मुजूमदार सारख्या विद्वानांनी या उठावामध्ये हिंदू आणि मुस्लीम जमातीमध्ये एकता नव्हती असे म्हटले आहे. तर या विषयावर निरपेक्ष अध्ययनानंतर जस्टीन मेकार्थी या विद्वावांने, ''हिंदू आणि मुसलमान आपला आंतरिक विरोध बाजूला ठेवून इसाईंच्या विरूध्द एकतेने लढले.''[2] असे म्हटले.

उठावातील हिंदू-मुस्लीम ऐक्य :

इ.स.1857 च्या घटनेमध्ये भारतातील हिन्दू व मुस्लीम या प्रमुख जमाती प्रामुख्याने सहभागी असलेल्या दिसून येतात. कारण भारतामध्ये या दोन प्रमुख राज्यकर्त्या जमाती होत्या. ब्रिटिशांच्या आगमनाने भारतातील हिन्दू व मुसलमांनाचे राजकीय अधिकार ब्रिटिशांनी संपुष्टात आणले होते. साम्राज्य विस्तारामुळे 'बळी तो कान पिळी' या म्हणण्यानुसार भारतीयांशी व्यवहार करण्याला सुरूवात केली. तसेच ईसाई धर्माच्या श्रेष्ठत्वाच्या भावनेने सैनिकांवर अनेक प्रकारचे धार्मिक बंधने लादण्यात आली होती. त्यामुळे आपला धर्म भ्रष्ट करण्याचा प्रयत्न ब्रिटिशांनी चालविला आहे. या भावनेने हिंदू आणि मुसलमान भावनिकदृष्टया एकत्र लढले. अशा स्थितीमध्ये डमडम येथील कारखाण्यात काम करणाऱ्या मेहतराकडून एनफिल्ड बंदुकीला पाहिजे असलेल्या काडतुसाला गायीची आणि डुकराची चरबी लावतात असा खुलासा झाला. यामुळे आपला धर्म बुडतो याची सैनिकांना जाणीव झाली. त्यामुळे ''बहरामपूरच्या एकोणीसाव्या देशी पलटनीने मार्च इ.स.1857 ला एनफिल्ड बंदुक वापरण्यास नकार दिला. त्यामुळे शासनाने त्यांना सेवामूक्त केले.''[3] अशा वातावरणात तेव्हाच ''चौतीसव्या बटालीयनच्या मंगल पांडे या शिपायाने सार्जंट मेजरवर 21 मार्च 1857 रोजी गोळी झाडून जखमी केले.''[4] मंगल पांडे या शिपायाला पकडून 8 एप्रिल रोजी फासावर देण्यात आले. ही बातमी वा-याप्रमाणे भारतातील इतर सैन्यामध्ये पसरली. याचा परीणाम म्हणून ''मीरत येथील 85 सैनिकांनी गायीची चरबी लावलेल्या काडतूसांना वापरण्यास नकार दिला. हा नकार ऐकताच, ब्रिटीश शासनाने त्या सैनिकांला 9 मे 1857 ला तोफखान्यासमोर उभे केले .आणि अपमानीत करून 8 ते 10 वर्षाच्या शिक्षा ठोठावल्या.''[5]

दुसऱ्याच दिवशी मीरतच्या सैन्याने उठाव केला. उठावकर्त्यांनी 11 मे रोजी दिल्लीच्या लाल किल्ल्यात प्रवेश केला. आणि मोघल साम्राज्याचा पद्च्युत बादशहा बहाद्दूरशहा जफर याला हिन्दुस्थानचा बादशहा म्हणून घोषीत केले. या नवनियुक्त बादशहाने हिंदू मुस्लीम एकतेकरीता 'गोहत्या बंदी' लागू केली. तसेच बहाद्दुरशहा जफरने जनतेसाठी आपला जाहिरनामा घोषीत केला. त्यामध्ये त्याने म्हटले की, ''दिल्ली वासीयांनो आपण जर मनात आणले तर शत्रूला क्षणार्धात नष्ट करू शकतो. आपल्या प्राणप्रिय धर्माला व देशाला भयमुक्त करू.''[6] यावरून बहाद्दूरशहा जफरला ज्या सैनिकांनी दिल्लीचा बादशहा म्हणून घोषीत केले होते. त्या सैन्यामध्ये हिंदु-मुसलमान या दोन्ही जमातीचे सैनिक होते. तसेच बादशहाने सुध्दा धर्माला व देशाला भयमुक्त करण्याचा आपला उद्देश जाहिरनाम्यात जाहिर सांगितला. याविषयी म्हैसुरचा न्यायकमिश्नर डेवेरो समोर साक्ष देतांना सिताराम बाबा या उठावकर्त्याने म्हटले की, ''नानासाहेब आणि मानसिंह यांनी दिल्लीच्या बादशहाशी संपर्क केला. आणि त्याच्यामध्ये मुसलमानांना बादाशाही आणि हिंदूना दिवानगीरी निश्चित झाली.''[7] म्हणजेच ठरलेल्या कराराने हिंदू आणि मुसलमान सोबत मिळुन उठावामध्ये सहभागी झाले होते. असे दिसून येते. उठावामध्ये ब्रिटिश विरोधी लढणाऱ्या नानासाहेब पेशवा यांची पुर्ण मदत मोघल बादशहाला होती. त्याचप्रमाणे अवध प्रांतामध्ये हिंदु-मुस्लीम यांच्यात एकता दिसून आली. अवधच्या मुस्लीम नवाबाने हिंदूना मुसलमानांच्या बरोबरीने सहभागी करून घेतले. यावेळी ''बेगम हजरत महलने आपला 12 वर्षाचा मुलगा बिरजीस कादीर याला अवधचा नवाब घोषित केले. तसेच हिंदू आणि मुसलमानांचे एक सल्लागार मंडळ स्थापन करून राज्यकारभार चालविला.''[8] तसेच अवधच्या नवाबाने प्रसिध्द केलेल्या जाहिरनाम्यात या दोन्हीही जमातीला आव्हान केले की, ''हिंदुस्थानातील सर्व हिंदुनो आणि मुसलमानांनो उठा बांधवांनो परमेश्वराने दिलेल्या देणगीत सर्वात मोठी देणगी स्वराज्य आहे, ही देणगी राक्षसांनी हिसकाऊन घेतली आहे. तुमच्या पराक्रमाने त्यांचा नायनाट होईल. लहान थोर भेद विसरून सैन्यात समता नांदली पाहिजे. म्हणून मी हिंदू बंधुस म्हणतो, या दिव्य कार्यात तुम्ही रणांगणात उडी घ्या.''[9] अशाप्रकारे अवधच्या नवाबाने या दोन्ही जमातीला आपल्यातील लहान मतभेद विसरुन शत्रूंविरूध्द एकत्र येवून लढा देण्याचे आव्हान केले.

हा संघर्ष केवळ मुस्लीमांचा किंवा हिंदुचा दिसून येत नाही, कारण ब्रिटिश शासनाला भारतामधून काढून देण्याकरीता खान बहाद्दूर, कुंवरसिंह, लक्ष्मीबाई, बहाद्दूरशहा जफर, नानासाहेब पेशवा, तात्या टोपे, मौलवी अहमदुल्ला, बेगम हजरत महल या वेगवेगळया धर्माच्या शासकांनी सहभाग घेतला होता. उठावाच्या दरम्यान भारतातील धार्मीक स्थळाचे योगदान उठावकर्त्याच्या बाजूने होते असे म्हणता येते. याविषयी सावकारांनी म्हटले की, ''उठावाच्या काळात मशीदीतून, देवळातून जनतेला आव्हान करण्यात आले. भिक्षेच्या निमित्ताने स्वातंत्र्याची चेतना उत्पन्न करण्यासाठी

मौलवी, पंडीत, फकीर, सन्यांशी यांना धाडण्यात आले."[10] भारतातील दोन प्रमुख जमातीचा ब्रिटिशांविरोधी उठाव होता. या उठावात दोन्ही जमातींना सारख्या नेत्त्वृत्वाची संधी मिळाली असे दिसून येते. ''संपूर्ण उठावामध्ये हिंदु व मुस्लीमांचे नेतृत्त्व होते. नानासाहेबासोबत अजिमुल्ला, बहादुरखॉ सोबत शोभाराम, झाँसीच्या राणी सोबत अफगान पठाण होते."[11]

हा संघर्ष सुरू झाला तेव्हा संघर्षामध्ये ब्रिटिशांच्या विरोधात त्यांच्याच फौजेतील 2,32,224 सैन्यापैकी निम्यापेक्षा जास्त सैन्यांनी सहभाग घेतला. या सैन्यामधील भारतीय सैन्य ऐकतेच्या भावनेने प्रेरीत झालेले होते. याविषयी उठावाचे दमन करण्यासाठी सहभागी झालेल्या सर जॉन लॉरेन्स म्हणतो की, ''बंडपूर्व सैन्याच्या दोषांपैकी सर्वात घातक दोष म्हणजे बंगालच्या सैन्याची एकात्मता व बंधुभाव होता."[12] तसेच डब्ल्यू. टेलर ने म्हटले की, ''हिंदू मुस्लीमांच्या षडयंत्रचा परिणाम आहे."[13] म्हणजेच या उठावात हिंदु मुस्लीम एकराष्टीयत्वाने सहभागी होते. उठावाचे दमन केल्यानंतर ब्रिटिशांनी भारताविषयक धोरणामध्ये बदल घडवून आणला. या धोरणामध्ये 'फोडा आणि राज्य करा' या धोरणाचा समावेश होता. वरील धोरणानूसार राबविलेल्या अनेक योजनामध्ये हिंदू आणि मुसलमान यांच्यात भेद वाढविण्याचा नियोजनबध्द रीतीने प्रयत्न केला. उदा. सैन्यामध्ये पुर्नरचना करतांना जातीच्या, धर्माच्या व प्रादेशीक, आधारावर सैन्य भरती केली. धोरणानुसार फौज निर्माण करण्यासाठी विल कमीशन गठीत करण्यात आले. ब्रिटिशांच्या या धोरणाविषयी कबुली देतांना सर ह्यु रोज याने म्हटले की, ''हिंदुस्थानच्या एका विभागाविरूध्द दुसरा विभाग उभा करून आपण आपली सत्ता कायम ठेवली पाहिजे, आणि याचप्रकारचे धोरण आपण चालविले पाहिजे."[14] तसेच उठावानंतर हिंदू-मुस्लमानामध्ये भेद निर्माण करण्यासाठी वेगवेगळया माध्यमातुन प्रयत्न करण्यात आले होते. त्यामध्ये ''बंगाल प्रान्तातील मुस्लीमांऐवजी तेथे हिंदुना जमीनदार केले. सैनिकी प्रवेशावर मुस्लीमांवर बंदी घालण्यात आली. सरकारी सेवेत हिंदुना प्राधान्य दिले, तर शिक्षण विभागात फारसी व अरबीचे महत्त्व कमी करण्यात आले."[15] म्हणजेच इ.स.1857 च्या उठावामध्ये हिंदू आणि मुस्लीम यांच्यामध्ये एकता होती. ती नष्ट करण्यासाठी वरील धोरणाचा उपयोग ब्रिटिशांनी केला.

यावरून असे म्हणता येईल की, इ.स.1857 मध्ये ब्रिटिशांच्या विरूध्द घडून आलेला संघर्ष स्वातंत्र्याचा उठाव म्हणता येतो. त्याचबरोबर या उठावामध्ये बहाद्दूरशहा जफर या मुस्लीम सम्राटाला भारताचे नेतृत्व करण्याची विनंती हिंदू व मुस्लीम सैनिकांनी केली. तसेच नानासाहेब सोबत अजिमुल्ला होता. खान बहादुर सोबत शोभाराम, झॉशीच्या राणीसोबत अफगान पठाण, आणि अवधच्या नवाबासोबत हिंदू - मुस्लिमांचे प्रतिनिधी मंडळ असलेले दिसून येते. म्हणजेच इ.स.1857 च्या उठावामध्ये हिंदु-मुस्लीमांचे ऐक्य होते, असे म्हणता येते.

इ.स. 1857 च्या उठावानंतर इ.स. 1885 पर्यंतचा कालखंड ब्रिटिशांच्या भारत विषयक धोरणाच्या वास्तविक अंमलबजावणीचा दिसुन येतो, कारण इ.स. 1857 च्या उठावानंतर ब्रिटिशांच्या भारत विषयक धोरणामध्ये आमुलाग्र बदल घडून आला. इ.स 1857 च्या उठावासारख्या प्रसंगाचा सामना करण्याचा प्रसंग ब्रिटिश सरकारवर पुन्हा येवू नये, आणि ब्रिटिश शासन भारतात अधिकाधिक काळ अस्तित्वात राहिले पाहिजे, हा ब्रिटिश सरकारच्या धोरणाचा स्पष्ट हेतू होता.

उठावाचे दमन केल्यानंतर भारताची सत्ता ईस्ट इंडिया कंपनी कडून काढून घेण्यात आली. ती आता ब्रिटिश राणीच्या हातात सोपविण्यात आली. या सत्ताबदलामुळे ब्रिटिश सरकारचे भारतीयाप्रती कोणत्या प्रकारचे धोरण असेल यांची रूपरेषा राणीच्या जाहिरनाम्यातून 1 नोव्हेंबर 1858 रोजी जाहीर करण्यात आली. राणीच्या जाहिरणाम्यातील तरतुदी भारतीयांना आशादायी वाटल्या. याच तरतुदीच्या आधारावर भारतविषयक राणीच्या जाहिरणामातील धोरणाची अंमलबजावणी लवकरच होईल, अशी अपेक्षा भारतीयांना होती. त्याचप्रमाणे इ.स.1858 च्या सुधारणा कायद्याने प्रशासकीय सुधारणा करण्याची घोषणा या माध्यमातून करण्यात आली. परंतु लवकरच या घोषणातील फोलपणा भारतीयांच्या समोर आला. या वेळी भारतात तरूण पिढीमध्ये नवीन विचारांचा विकास घडवून येत होता. तो विचारांचा विकास ब्रिटिश साम्राज्याला घातक होणार होता, त्यामुळे अशा संकटांचा सामना करण्यासाठी, ब्रिटिशांनी साम्राज्याला बळकटी प्राप्त करण्यासाठी, 'फोडा आणि राज्य करा' या धोरणाचा अवलंब प्रत्यक्षपणे करुन ते धोरण राबविण्याला सुरूवात केली.

संदर्भ :

1) Sen. S. N., 'Eighteen Fifty Seven', Publication Division Government of India. P. 411.
2) ताराचंद, 'भारतीय स्वतंत्रता आन्दोलन का इतिहास', हिन्दी आवृत्ती 1969, खंड 2 रा, सुचना व प्रसारण मंत्रालय, भारत सरकार पृ. 44.
3) Vipin Chandra,, 'Indias Struggle for Independence', Publication penqain books, Gurgaon India, 1989, P. 32.
4) Ibid .P. 32.
5) सावरकर. वि. दा., '1857 चे स्वातंत्र समर',.प्रकाशक, पाठक सूर्यकांत, प्रकाशन ग्राहकाहित, प्रकाशन पुणे. 2008, पृ. 99.
6) सावरकर. वि. दा., पुर्वोक्त, पृ. 30.
7) ताराचंद, पुर्वोक्त, पृ. 94-95.
8) कित्ता, पृ. 82.
9) सावरकर. वि. दा., पुर्वोक्त, पृ. 31.
10) कित्ता. पृ. 79.
11) महाजन व्ही. डी. 'आधुनिक भारत का इतिहास', एस. चंद. प्रकाशन दिल्ली, 11 संस्करण, 1989, पृ. 359.
12) Gopal Ram., 'India Muslims a political History', Asia publication House, New York, 1959,P. 45.
13) ग्रोवर. बी. एल. 'आधुनिक भारत का इतिहास', एस. चंद प्रकाशन दिल्ली. 07 संस्करण, 2003, पृ. 184
14) Gopal. S. 'British Policy in India', Publication The Syndics of the Combridge University Press, Lonndon, 1965, P. 35.
15) शर्मा. उर्मीला, शर्मा. एस.के., 'भारतीय राष्ट्रीय आन्दोलन', एटलान्टींक पब्लीकेशन दिल्ली, पृ. 202.